दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी • सोमवार दि.१९ जानेवारी २०२६ • 9422660077 • आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ • वर्ष ३ रे • अंक १४६ • पाने ४ • किंमत ४ रुपये

Beed (Mahmar) Daily Marathi • Monday 19 January 2026 • 9422660077 • RNI-MAHMAR / 2023 / 87555 • Year - 3rd • Issue 146 • Pages 4 • Rate 4 Rs



दैनिक महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
वादळ वार्ता
RNI/MAHMAR/2023/87555
॥ महाराष्ट्रभर प्रतिनिधी नेमणूक ॥
https://epaper.vadalvarta.com
महाराष्ट्रातील सर्व जिल्हे, तालुके, सर्कल व गावे येथे उत्साही, निर्भीड व समाजभान असलेले प्रतिनिधी नेमायचे आहेत.
पदे: जिल्हा प्रतिनिधी • तालुका प्रतिनिधी • सर्कल प्रतिनिधी • गाव प्रतिनिधी
पात्रता:
- पत्रकारितेची आवड व सामाजिक भान
- स्थानिक प्रश्न मांडण्याची क्षमता
- मोबाईल / डिजिटल माध्यमांचे ज्ञान
- बातमी लेखन व फोटो / व्हिडिओ पाठवण्याची तयारी
- अनुभव नसला तरी चालेल (नवीन उमेदवारांना संधी)

प्रतिनिधींना मिळणाऱ्या सुविधा:
- दैनिक वादळ वार्ता ओळखपत्र
- सामाजिक प्रश्नांना व्यासपीठ
- बातम्या प्रसिद्ध करण्याची संधी
- पत्रकारितेत नाव व ओळख
- पुढील काळात विशेष संधी व जबाबदाऱ्या

विशेष सूचना:
- निर्भीड, अन्यायाविरोधात आवाज उठवणाऱ्यांना प्राधान्य
- ग्रामीण व शहरी भागातील उमेदवारांचे स्वागत

मुख्य संपादक : अजय भांगे संपर्क मो.न.9422660077


# बीडमध्ये शरद पवार गटाला धक्का! माजी आमदार संगीता ठोंबरेंचा शिवसेनेत प्रवेश

## केज मतदारसंघात शिंदे गटाची ताकद वाढणार



**दैनिक वादळ वार्ता**
**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषद निवडणुकीच्या तोंडावरच आता बीडच्या राजकारणात मोठी घडामोड घडली आहे. माजी आमदार संगीता ठोंबरे यांनी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. संगीता ठोंबरे यांच्या शिवसेना शिंदे गटात प्रवेशाने शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला धक्का बसला आहे. तसेच संगीता ठोंबरे यांच्या पक्षप्रवेशाने बीडमध्ये शिंदे गटाची ताकद वाढण्यास मदत होणार असल्याचे बोलले जात आहे.संगीता ठोंबरे यांनी खासदार बजरंग सोनवणे यांच्या मध्यस्थीने शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. आता बीड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदासाठी संगीता ठोंबरे यांनी शिंदे गटात प्रवेश केला असल्याची चर्चा सुरू आहे. संगीता ठोंबरे या एकेकाळी भाजप नेत्या पंकजा मुंडे यांच्या अत्यंत विश्वासू सहकारी मानल्या जात होत्या. केज मतदारसंघातून संगीता ठोंबरे २०१४ च्या विधानसभा निवडणुकीत विजयी



झाल्या होत्या. २०१९ च्या निवडणुकीत भाजपने त्यांना उमेदवारी देण्याऐवजी नमिता मुंदडा यांना उमेदवारी दिली होती. त्यामुळे संगीता ठोंबरे नाराज झाल्या होत्या.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने नमिता मुंदडा यांना उमेदवारी दिल्यानंतर संगीता ठोंबरे यांनी बंडखोरी करत अपक्ष अर्ज दाखल केला होता. मात्र, अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी त्यांनी माघार घेत थेट राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाला पाठिंबा जाहीर केला. त्यानंतर खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत त्यांनी शरद पवार गटात अधिकृत प्रवेश केला होता, ज्यामुळे या मतदारसंघात राष्ट्रवादीची ताकद वाढल्याचे मानले जात होते.मात्र, आता संगीता ठोंबरे यांनी शरद पवार गटाला सोडचिठ्ठी देत एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. ऐन राजकीय घडामोडींच्या काळात त्यांनी घेतलेल्या या निर्णयामुळे शरद पवार गटाला केज मतदारसंघात मोठा धक्का बसला आहे. ठोंबरे यांच्या या सत्तेतील पक्षासोबतच्या प्रवेशामुळे मतदारसंघातील राजकीय गणिते पुन्हा एकदा बदलली असून, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत याचा कोणाला फायदा होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# प्रा.रमेश सरवदे यांचा राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरव, सर्व स्तरातुन अभिनंदनाचा वर्षाव

**दैनिक वादळ वार्ता**
**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

दि.१८जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता आरंभ बँक्वेट हॉल परेल मुंबई येथे राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा २०२६ आयोजित करण्यात आला होता. समाजात ज्ञानाचा दीप प्रज्वलित करणाऱ्या व विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणाऱ्या शिक्षकाचा गौरव करण्याच्या उद्देशाने बी.द. चेंज फाउंडेशनच्या वतीने राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ श्री रत्नेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे संगीत विभाग प्रमुख प्रा. रमेश ज्ञानोबा सरवदे यांना प्रदान करण्यात आला.सदरील सोहळ्या प्रसंगी इंडियन आर्मी मेंबर ऑफ पार्लमेंटचे ब्रिगेडियर सुधीरजी सावंत सर, कमिशनर ऑफ पोलीस श्रीमती रुक्मिणी गलांडे मॅडम,कलर्स मराठी या चॅनलवरील तुझ्यात जीव रंगला या मालिकेतील अभिनेत्री निवेदिता पगार, महाराष्ट्र पोलीस मुंबई च्या श्रीमती संध्या निकम मॅडम,एक्झिक्युटिव्ह प्रेसिडेंट त्रिदल सैनिक संघ अँड सैनिक फेडरेशन नाशिकचे श्री.अरुणजी भंडारे साहेब,ब्युरो चीफ सुदर्शन न्युज महाराष्ट्राचे दीपकजी चव्हाण सर इत्यादी मान्यवर मंडळीं च्या उपस्थितीत



प्रा.रमेश ज्ञानोबा सरवदे यांना राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६ हा पुरस्कार देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यामुळे श्री.सोमेश्वर शिक्षण संस्था जिरेवाडी या संस्थेचे सचिव अड. गोपाळरावजी कांदे सर संस्थेचे अध्यक्ष गोवर्धन रावजी कांदे सर आणि श्री.रत्नेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य सतीशजी किलचे सर यांनी भरभरून कौतुक केले पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या या मिळालेल्या पुरस्काराचे सर्व स्तरावर कौतुक केले जात आहे.व त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला जात आहे.

# कहाटूळ येथे एन एन एस शिबिरात 'पाणी व्यवस्थापना'चा जागर; शाश्वत विकासासाठी युवकांच्या सहभागावर भर

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदूरबार । दिपक गोसावी**

राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून युवकांमध्ये शाश्वत विकासाचा दृष्टिकोन निर्माण होणे आवश्यक आहे. जल, जमीन आणि जीवन यांचा परस्परसंबंध समजून घेऊन युवकांनी ग्रामविकासाच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदवल्यास खऱ्या अर्थाने समृद्ध गावाचे स्वप्न साकार होईल, असे प्रतिपादन शहादा येथील (कै.) सौ. जी. एफ. पाटील ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या सुरेखा पाटील यांनी केले.

तालुका एज्युकेशन सोसायटी संचलित या महाविद्यालयाचे विशेष श्रमसंस्कार शिबीर दत्तक गाव कहाटूळ येथे उत्साहात सुरू आहे. शिबिराच्या चौथ्या दिवशी 'पाणी व्यवस्थापन आणि शाश्वत विकास' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी त्या अध्यक्षस्थानावरून बोलत होत्या.





या कार्यक्रमाचे मुख्य वक्ते पाणी फाउंडेशनचे गुणवंत पाटील यांनी ग्रामीण विकासातील आव्हानांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, भारत हा कृषिप्रधान देश असूनही आज वाढती लोकसंख्या, हवामान बदल आणि अनियमित पावसामुळे भूजल पातळी घटत आहे. या गंभीर समस्यांवर 'पाणलोट व्यवस्थापन'आणि 'पडीत जमीन विकास' हेच प्रभावी उपाय आहेत. शाश्वत विकासाची व्याख्या स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, वर्तमान गरजा पूर्ण करताना भावी पिढीच्या नैसर्गिक संसाधनांवर गदा येऊ न देणे, हीच खरी शाश्वत प्रगती आहे.

या प्रसंगी व्यासपीठावर वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर जी. पाटील, क.ब.चौ. उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे विभागीय समन्वयक प्रा. दीपक वळवी, एन.एस.एस. कार्यक्रम अधिकारी काकासाहेब अनपट, आणि सहाय्यक कार्यक्रम अधिकारी योगेश साळवे, मीनाक्षी साळवे आदि मान्यवर उपस्थित होते.

शिबिरादरम्यान केवळ चर्चा न करता श्रमदान, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून स्वयंसेवकांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण केली जात आहे. जल आणि मृद संधारणाच्या कामातून ग्रामीण अर्थव्यवस्था कशी सक्षम होऊ शकते, याचे धडे विद्यार्थी गिरवत आहेत.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन स्वयंसेवक कु. भावेश सोनवणे याने केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी उपप्राचार्य पी.बी. पाटील, भगवती पाटील, रंजना पावरा, देवेंद्र महाजन, कमलेश पाटील, एच.एस. चव्हाण, हर्षल सूर्यवंशी आणि राजेश सोमवंशी यांसह सर्व शिक्षक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## वादळी कट्टा

त मागताना नेता गोड बोलतो,
विजय मिळताच दूरच राहतो,
काम विचारलं की वेळच नाही,
पाच वर्षे जनता, नेता मात्र दिसत नाही.

मंचावर नेता मोठे शब्द फेकतो,
विकासाची स्वप्ने रोजच रेखतो,
स्वप्न संपताच वास्तव उरतं,
भाषण राहातं, काम मात्र मरतं.

जनतेच्या नावाने घोषणा होतात,
फायद्याच्या वाटा वेगळ्याच जातात,
नेता पुढे, जनता मागे,
सत्ता आली की बदलतात वागे.

निवडणुकीत आश्वासनांचा पाऊस,
विजयानंतर शांततेचा हाऊस,
नेता राहतो तोच दरवेळी,
फसते मात्र जनता वेळोवेळी

संपादक
अजय भांगे



# 'स्वाराती'तील सुविधांचा खा.बजरंग सोनवणे आज घेणार आढावा,सर्व वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी राहणार उपस्थित

**दैनिक वादळ वार्ता**
**केज । प्रतिनिधी**

अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय,अंबाजोगाई येथे रुग्णसेवा, आरोग्य सुविधा, मनुष्यबळ,औषध साठा,पायाभूत सुविधा तसेच प्रलंबित विविध प्रश्नांबाबत खा.बजरंग सोनवणे सविस्तरआढावा घेणार आहेत.आज सोमवार,दि.१९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२-३० वाजता आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.



बीड लोकसभा मतदार संघाचे खा.बजरंग मनोहर सोनवणे यांच्या पुढाकारा तून सदर बैठक आयोजित करण्यात येत असून,या संदर्भात रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालय प्रशासनास पत्राद्वारे सूचनाही दिल्या आहेत. सदर बैठकीस संबंधित विभागप्रमुख,वैद्यकीय अधिकारी तसेच प्रशासनातील जबाबदार अधिकारी उपस्थित राहणार आहेत.ग्रामीण भागातील रुग्णांना दर्जेदार व वेळेवर आरोग्य सेवा मिळावी,रुग्णालया तील सुविधा अधिक सक्षम व्हाव्यात तसेच दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या अडचणींवर ठोस निर्णय घेण्यात यावा, या उद्देशाने ही आढावा बैठक घेण्यात येणार असल्याचे पत्रात नमूद करण्यात आले आहे.या बैठकीत रुग्णसेवेशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा करून आवश्यक त्या उपाययोजना सुचविण्यात येणार असून, आरोग्य यंत्रणेमधील समन्वय अधिक बळकट करण्यावर भर दिला जाणार आहे.खा.बजरंग सोनवणे यांनी बीड जिल्ह्यात, आरोग्य, शिक्षणदळणवळण अशा विषयांना कायम महत्व दिलेले आहे.आरोग्य विभागातील अडचणी सोडविण्यासाठी ते तत्पर असतात. जिल्ह्यातील विविध आरोग्य केंद्रात देखील ते सरप्राईज व्हिजीट करत असतात. यामुळे आरोग्य यंत्रणा सतर्क असते.जिल्ह्यातील रूग्णांना दर्जेदार उपचार, सुविधा मिळाव्यात यावर खा.बजरंग सोनवणे यांचा भर आहे.

# तळोद्यात दिवसाढवळ्या घरफोडी; कपाटातून ५० हजारांचा ऐवज लंपास

**दैनिक वादळ वार्ता**
**नंदूरबार । दिपक गोसावी**

शहरातील दत्त कॉलनी भागात दिवसाढवळ्या घरफोडीची घटना घडली असून, अज्ञात चोरट्याने राहत्या घराचे कुलूप उघडून कपाटातील सोन्या-चांदीच्या दागिन्यांसह रोख रक्कम असा एकूण ४९,४०० रुपयांचा मुद्देमाल लांबवला आहे. याप्रकरणी तळोदा पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी सोनाली सागर साळुंखे (राहणार दत्त कॉलनी, चिरायु लॉज जवळ, तळोदा) या दिनांक १६ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ८:३० वाजेच्या सुमारास घरात नसताना ही चोरी झाली. अज्ञात संशयीताने फिर्यादीच्या संमतीशिवाय लबाडीच्या इराद्याने घराच्या दरवाजाची कडी उघडली आणि घरात प्रवेश केला. घरातील पत्र्याच्या कपाटाचा ड्राव्हर उघडून त्यातील पाकिटात ठेवलेले दागिने आणि रोख रक्कम चोरून आरोपी पसार झाला.

**यावेळी चोरट्याने**

रोख रक्कम: २०,००० रुपये (५०० व २०० रुपयांच्या चलनी नोटा).

सोने: २८,००० रुपये किमतीची सोन्याची अंगठी



(अंदाजे ४ ग्रॅम).

चांदी: १,४०० रुपये किमतीचे चांदीचे पायातील कडे (१ तोळा).

एकूण किंमत: ४९,४०० रुपये. असा ऐवज लंपास केला आहे.

या घटनेबाबत दिनांक १७ जानेवारी रोजी रात्री ८:५९ वाजता तळोदा पोलीस ठाण्यात फिर्याद नोंदवण्यात आली. पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५(अ) आणि ३३१(४) अन्वये गुन्हा रजिस्टर दाखल केला आहे.

पोलीस निरीक्षक राजन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार गौतम बोराडे या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. दिवसाढवळ्या झालेल्या या चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली असून चोरट्यांचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर आहे.

# संपादकीय

## आता विकासाचे बोला...

महानगरपालिका निवडणुकांचा गदारोळ संपला, निकाल लागले आणि विजयी उमेदवारांच्या गळ्यात हार पडले. पण आता मतदारांचा सवाल बदलला आहे. प्रचारात 'विकास' हा शब्द वारंवार ऐकू आला; मात्र प्रत्यक्षात तो कधी आणि कसा दिसणार, हा प्रश्न सामान्य नागरिक विचारू लागला आहे. विजयाचा जल्लोष क्षणिक असतो, पण जबाबदारी मात्र पाच वर्षांची असते. म्हणूनच आजपासूनच नव्हे, तर आत्ताच नवनिर्वाचित नगरसेवकांनी विकासाच्या दिशेने ठोस पावले उचलण्याची गरज आहे, कारण आता ते पक्षाचे नाही, तर प्रभागातील प्रत्येक नागरिकाचे प्रतिनिधी आहेत.

महाराष्ट्र राज्यातील २९ महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या रणधुमाळीत विकासाला मत द्या म्हणून मतदार राजाला साद घालणारे उमेदवार निवडून आल्याने 'आता विकासावर बोला' असे प्रभागातील सुजाण नागरिक म्हणू लागले आहेत. तेव्हा काल जरी विजयाचा गुलाल उधळला तरी उद्या म्हणण्यापेक्षा आजपासून विकासकामांना नवनिर्वाचित नगरसेवकांना सुरुवात करावी लागेल. कारण आता ते एका पक्षाचे नसून प्रभागाचे नगरसेवक आहेत याची जाणीव असायला हवी. जवळजवळ नऊ वर्षांनंतर निवडणुका होत आहेत हे सुद्धा लक्षात ठेवायला हवे.राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांच्या १५ डिसेंबर, २०२५ रोजीच्या परिपत्रकानुसार राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी निवडणूक कार्यक्रम सन २०२५-२६ जाहीर झाला. त्यानंतर सर्वप्रक्रिया होऊन निवडणुकांची रणधुमाळी सुरू झाली. यात राज्यातील २७ महानगरपालिकांची मुदत संपली होती, तर जालना व इचलकरंजी येथील दोन महानगरपालिका नवनिर्मित होत्या. राज्यातील एकूण २९ महापालिकांच्या १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होऊन १६ जानेवारीला निकाल सुद्धा लागला. म्हणजे गुलाल कोण उधळणार याचे उत्तर सुद्धा मतदार राजाला काल मिळाले. तेव्हा मतदान झाले, निकाल लागला, 'आता विकासाचे बोला' असे मतदार राजा व नागरिक नवनिर्वाचित नगरसेवकांना म्हणत आहेत. त्यामुळे राजकीय पक्ष आणि त्या पक्षातून निवडून आलेले नगरसेवक यांनी आपल्या जाहीरनाम्यात दिलेल्या वचनांची पूर्तता करण्यासाठी विकासकामांना गती दिली पाहिजे. ते सुद्धा नि:पक्षपातीपणे सार्वजनिक काम करायला हवे. जरी मी पक्षाचा सभासद असलो तरी लोकप्रतिनिधी आहे. लोकांनी मला निवडून दिले आहे.तेव्हा लोकांच्या कल्याणासाठी मी काम करेन ते सुद्धा भारतीय संविधानानुसार, देशातील लोकशाहीचा पाया भक्कम करण्यासाठी. तरच आपल्या नगरसेवक पदाच्या कार्यकाळात निवडून आलेल्या प्रभागाचा सर्वांगीण विकास होण्याला मदत होईल. निवडून आलेल्या नगरसेवकांमधून 'महापौर' निवडला जातो. महापौर प्रमुख असतात, तर प्रशासकीय अधिकारी म्हणून महापालिका आयुक्त काम पाहतात. ज्या शहराची लोकसंख्या दहा लाखांपेक्षा जास्त असते अशा शहरी क्षेत्राचे व्यवस्थापन महापालिकेमार्फत करण्यात येते. शहरातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन त्यांना विकासात्मक विविध सेवा पुरविण्याचे काम महापालिका करीत असते. शहराचे विकासाच्या दृष्टिकोनातून विकास आराखडा तयार करणे, शहरातील नागरिकांना स्वच्छ पिण्याचे पाणी देणे, रस्ते वाहतूक व्यवस्थित करणे, योग्य ठिकाणी नाला किंवा नद्यांवर पूल बांधणे, रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी गटारे बांधणे, वीजपुरवठा पुरविणे, शहरातील प्रत्येक विभागामध्ये मोफत आरोग्य सेवा देणे, वाहतूक सेवा, घनकचरा विभागामार्फत कचऱ्याची विल्हेवाट लावणे, सुखा कचरा आणि ओला कचरा स्वतंत्र डब्यात गोळा करणे, मुलांना मोफत प्राथमिक शिक्षण देऊन महानगरपालिकेमार्फत शाळा चालविणे. यासाठी विविध नागरी सेवेतून उत्पन्न मिळविले जाते. यात मालमत्ता उत्पन्न कर नागरिकांकडून गोळा करणे, पाणीपट्टी, दंड वसुली आणि राज्य सरकारचे अनुदान इत्यादी मार्गाने उत्पन्न मिळवून ही स्वायत्त संस्था आपली विविध कामे करीत असते. आता निवडून आलेल्या नगरसेवकांना वचनपूर्ती करावी लागेल. राज्यात २९ शहरांमध्ये महानगरपालिका असल्या तरी त्याची फारशी स्वच्छता दिसत नाही. जरी असली तरी स्वच्छतागृह फारच अस्वच्छ असतात. त्याकडे लक्ष देणे गरजचे आहे. कोविडमध्ये त्याचा सर्वांना अनुभव आला असेल. तेव्हा सुंदर शहरासाठी स्वच्छता अतिशय महत्त्वाची असते. तेव्हा घनकचरा व्यवस्थापकांनी कामामध्ये सतर्क राहावे लागेल. त्यावर करडी नजर नगरसेवकांना ठेवावी लागणार आहे.आपली मातृभाषा मराठी आहे. महापालिकेच्या शाळा बंद पडत चालल्या आहेत. काही ठिकाणी शाळेत मुलेच नाहीत अशी परिस्थिती दिसते. ही मराठीच्या दृष्टीने धोक्याची घंटा आहे. तेव्हा मराठी शाळेची घंटा रोज वाजली पाहिजे. तरच मराठी भाषेला मानाचे पान मिळेल. सध्या राज्यात रोजगारीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. त्या आनुषंगाने रिकाम्या हातांना रोजगार मिळाला पाहिजे. तो सुद्धा कायमस्वरूपात असावा. अजूनही अनेक शहरात स्वच्छ आणि पुरेसे पाणी नागरिकांना मिळत नाही. तेव्हा स्वच्छ पाणी नागरिकांना कसे मिळेल या दृष्टिकोनातून प्रयत्न करावा. अनेक ठिकाणी रस्ता रुंदीकरणाचे काम सुरू असून पूर्ण झालेले नाही. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. शहरातील सार्वजनिक बससेवा सुरळीत चालली पाहिजे ती सुद्धा फायद्यात. कारण ती त्या शहराची जीवनवाहिनी असते. त्यात डबलडेकरच्या बससेवा आणि आताच्या आधुनिक बससेवा तोट्यात चालत आहेत. त्यावर योग्य ती उपाययोजना होणे गरजेचे आहे. तसेच वाढत्या विजेच्या दराकडे सुद्धा लक्ष द्यायला हवे. यात सर्वसाधारण नागरिकांना जास्त भाडेवाडीची झळ पोहोचते. निवडणूक काळात लाडक्या बहिणींना आचारसंहितेमुळे अग्रिम लाभापासून वंचित राहावे लागले होते त्यांचे सुद्धा सक्षमीकरण आता झाले पाहिजे. शहरातील पादचाऱ्यांसाठी असणाऱ्या फुटपाथवर अतिक्रमण झालेले आहे ती जागा मोकळी करणे. त्यात फेरीवाले, दुकानानजीक अवैद्य धंदे, बांधकाम व गाड्या उभ्या करणे यामुळे वाहतुकीची कोंडी निर्माण होत असते. यातून मोकळा श्वास घेण्यासाठी नगरसेवकांनी पुढाकार घ्यावा. महत्त्वाची बाब म्हणजे, महानगरपालिकेच्या शाळांमध्ये जे अतिक्रमण झालेले आहे त्यावर सुद्धा निर्बंध घालावे लागतील.शहरात मध्यभागी क्रीडा संकुल ज्या ठिकाणी नाहीत त्या ठिकाणी बांधण्यात याव्यात. तेव्हा राज्यातील २९ महानगरपालिकेतील नवनिर्वाचित नगरसेवकांना मतदार राजाने उमेदवाराच्या नावाच्या समोर असणाऱ्या चिन्हाच्या समोरील बटण दाबून विजयी करून दिले आहे. त्यामुळे आपल्या प्रभागातील मतदार राज्याला नगरसेवकांना 'आता विकासाचे बोला' अशी वेळ बोलण्याची येण्यापूर्वी नागरिकांच्या विकासासाठी विकासकामे हाती घ्यावी लागतील.

# नंदुरबार जिल्हा रुग्णालयात शेकडो बालकांची मोफत आरोग्य तपासणी; हृदयविकार आणि ओठ-टाळू दोषांवर होणार मोफत उपचार

**दैनिक वादळ वाता**
**नंदुरबार । दिपक गोसावी**

राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत (आरबीएसके) नंदुरबार जिल्हा रुग्णालयातील जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्रात (डीईआयसी) शून्य ते १८ वर्षे वयोगटातील बालकांसाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात प्रामुख्याने जन्मजात हृदयविकार (२-डी इको तपासणी) तसेच दुभंगलेले ओठ आणि टाळू असलेल्या बालकांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून विनामूल्य तपासणी करण्यात आली.



या स्तुत्य उपक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी शासनाच्या योजनेतून हृदय शस्त्रक्रिया यशस्वी झालेल्या बालकांचा आणि त्यांच्या पालकांचा विशेष सन्मान करण्यात आला. आपल्या मुलांचे प्राण वाचल्यामुळे पालकांच्या चेहऱ्यावर समाधान पाहायला मिळाले.

मुंबई येथील रहेजा रुग्णालयातील बाल हृदयरोग तज्ज्ञ डॉ. रौनक के. शेठ आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी या शिबिरात सेवा दिली. ज्या बालकांना शस्त्रक्रियेची तातडीची गरज आहे, अशा बालकांना पुढील उपचारांसाठी शासनाच्या अंगीकृत रुग्णालयांमध्ये पाठवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या शिबिरात एकूण १३० बालकांची सखोल तपासणी करण्यात आली.

जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनय सोनवणे यांनी पालकांना आवाहन केले की, बालकांमध्ये खालील लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांशी संपर्क साधावा:
दूध पिताना बाळ थकणे किंवा बाळाला धाप लागणे.
ओठ आणि नखे निळसर पडणे.
वारंवार सर्दी-खोकला होणे किंवा चक्कर येणे.
वजनात वाढ न होणे.
जिल्हा कार्यक्रम पर्यवेक्षक मनोहर ढीवरे यांनी माहिती दिली की, अंगणवाड्या, शाळा आणि आश्रमशाळांमध्ये आरबीएसके पथकाद्वारे नियमित तपासणी सुरू असते. शिबिरात आढळलेल्या व्याधीग्रस्त मुलांवर शासकीय योजनेतून खासगी रुग्णालयांमध्ये पूर्णपणे मोफत शस्त्रक्रिया आणि उपचार केले जाणार आहेत.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी जिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, जिल्हा शीघ्र हस्तक्षेप केंद्रातील कर्मचारी आणि आरबीएसके पथकाने परिश्रम घेतले.

# मुखेड तहसील कार्यालयाच्या वतीने पत्रकारांचा सत्कार

## उपजिल्हाधिकारी पाटील व तहसीलदार जाधव यांनी दिल्या शुभेच्छा

**दैनिक वादळ वार्ता**
**मुखेड । प्रतिनिधी**

दर्पण दिनाचे औचित्य साधून,मकर संक्रांतच्या निमित्त उपजिल्हाधिकारी अनुप पाटील यांच्या अध्यक्षतेखाली तहसीलदार राजेश जाधव यांनी दिनांक १६ जानेवारी रोजी तहसिल कार्यालयात पत्रकारांचा सन्मान सोहळा आयोजित केला होता.या कार्यक्रमात उपजिल्हाधिकारी अनुप पाटील तहसीलदार राजेश जाधव यांच्या हस्ते उपस्थित सर्व पत्रकारांचा शाल,पुष्पहार,डायरी,लेखणी व भेटवस्तू देऊन सन्मान करण्यात आला.

पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण हे मराठी वृत्तपत्र सुरू केले होते त्यामुळे हा दिवस संबंध देशामध्ये पत्रकार दिन म्हणून उत्सहात साजरा केल्या जातो त्याचेच औचित्य साधून १६ जानेवारी रोजी तहसिल कार्यालयात उपजिल्हाधिकारी अनुप पाटील,तहसीलदार राजेश जाधव यांनी मुखेड शहर व परिसरातील सर्व पत्रकारांचा यथोचित सन्मान करून गौरव केला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपजिल्हाधिकारी अनुप पाटील हे होते तर तहसीलदार राजेश जाधव,नायब




तहसीलदार एस.एस. मामीलवाड,नायब तहसीलदार शालिनी धुळे,पुरवठा निरीक्षण अधिकारी निलेश रोहनकर,नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे उपाध्यक्ष संदीप कामशेट्टे,जिल्हा संघटक सुनिल पौळकर,मुखेड तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष महेताब शेख,ज्ञानेश्वर डोईजड,असद बल्खी,बबलु मुल्ला यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रस्ताविक तहसिलदार राजेश जाधव यांनी केले तर सुत्रसंचलन महेताब शेख यांनी केले.उपस्थितांचे आभार नायब तहसीलदार शालिनी धुळे यांनी मानले. याप्रसंगी पत्रकार संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर डोईजड व सचिव राजेश बंडे यांनी दर्पण दिन्नाविषयी उपस्थितांना आपल्या मनोगतातुन महत्व सांगितले. यावेळी महसूल कर्मचारी संघटनेचे जिल्हा संघटक एस.एस.हुड्डे,तालुकाध्यक्ष परमेश्वर वारे,सचिव यु.पी. सुभेदार,तलाठी संघटनेचे सचिव सतिश देशमुख,सहाय्यक महसुल अधिकारी मोईन शेख, रुपेश मुधोळकर,महसूल सहाय्यक प्रशांत लिबेंकर,के.व्ही. महाडीवाले,संगिता वाडीकर, कमलावती कल्लेपवार,अनुराधा चिनसबवार,गंगागीर गिरी, दफेदार जि.एम.पिंगळे,गोविंद भास्करे,गौस शेख,राजेश जाधव, माधव गायकवाड,शरद नरबागे, संदीप गायकवाड, श्रिकांत श्रिरामे,रविना लुगारे,धम्मशिल्ला हणमंते यांच्यासह सर्व पत्रकार संघटनेचे पदाधिकारी,पत्रकार बांधव व तहसिल कार्यालयाचे अधिकारी तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**उपजिल्हाधिकारी व तहसीलदार यांनी दिल्या शुभेच्छा...**

दर्पण दिन्नानिमित्त आयोजीत कार्यक्रमात बोलताना देगलुर उपविभागाचे उपजिल्हाधिकारी अनुप पाटील व तहसीलदार राजेश जाधव यांनी दर्पण दिन व मकर संक्रांतीच्या उपस्थित सर्व पत्रकार बांधवांचा सत्कार करुन तिळगुळ देवून शुभेच्छा दिल्या.

# शेळगावच्या शिंगाडे वस्ती शाळेत भरला आनंद बाजार

**दैनिक वादळ वार्ता**
**शेळगाव । प्रतिनिधी**

राहुल जाधव जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व अंगणवाडी विठोबा माळ शाळेमध्ये विद्यार्थ्यांसाठी आनंद बाजार व महिलांसाठी हळदी कुंकवाचा कार्यक्रम शनिवार (दिनांक १७) रोजी मोठ्या उत्साहात साजरा झाला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला सरपंच उर्मिला शिंगाडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या शेतामधील भाजीपाला, खाद्यपदार्थ,म हिलांसाठी स्टेशनरी अशा विविध वस्तू विकण्यासाठी ठेवल्या.याचा पालकांनी देखील आनंद घेतला. तसेच प्राथमिक शाळेमध्ये चित्रकला, हस्ताक्षर आणि रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आले होते.विद्यार्थ्यांना आर्थिक व्यवहाराचे ज्ञान मिळावे म्हणून हा आनंदी बाजार कार्यक्रम घेतला असल्याची माहिती मुख्याध्यापक भारत बरळ यांनी दिली.


यावेळी छत्रपतीचे माजी संचालक लक्ष्मणराव शिंगाडे,शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अमोल शिंगाडे,उपाध्यक्ष ऐश्वर्या ननवरे, ग्रामपंचायत माजी सदस्या सुप्रिया शिंगाडे,शिक्षक बाळासाहेब साबळे,अंगणवाडी सेविका लक्ष्मी मोहिते,मदतनीस अंजली माने, शर्मिला शिंगाडे यांच्यासह पालक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# मुख्यमंत्री फडणवीस आणि भाजप प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण हे महानगर पालिका निवडणुकीतील भाजपच्या ऐतिहासिक विजयाचे धुरंधर शिल्पकार

**दैनिक वादळ वार्ता**
**नवी मुंबई । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकांमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकसित महाराष्ट्राच्या प्रचाराला राज्यातील जनतेने उत्स्फूर्तपणे पाठिंबा व्यक्त केल्याचे चित्र निकालांमुळे स्पष्ट झाले आणि त्याच बरोबर शहरी मतदाराची अचूक नस माहिती असलेल्या भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केलेल्या विचारधारेसोबत राहण्याच्या आवाहनाला मतदारांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याचे निकालांवरून दिसले. मागील वर्षी जानेवारीत रविंद्र चव्हाण यांनी भाजपा प्रदेश कार्यकारी अध्यक्षपदाची धुरा सांभाळल्यानंतर राज्यात दीड कोटी प्राथमिक सदस्यांचा टप्पा गाठण्याचे उद्दिष्ट पूर्ण केले होते तिथेच ते अर्धी लढाई जिंकल्याचे आज या दणदणीत विजयाने स्पष्ट झाले.भाजपा हा धोरण आखणारा आणि धोरण राबविणारा पक्ष आहे. निवडणुकांचे नियोजन, तिकीट वाटप, सभांचे नियोजन याबरोबरच विरोधी पक्षांना जोखण्याचे कसब देवेंद्र आणि रविंद्र या भाजपाच्या जोडीकडे आहे. सरकार आणि भाजपा महाराष्ट्र प्रदेश पक्ष यातील समन्वयाचे हे यश असल्याने हा अभूतपूर्व विजय मिळाल्याचे विश्लेषण राजकीय पंडितांनी केले आहे. महाराष्ट्र प्रदेश भाजपाचे शीर्षस्थ नेतृत्व म्हणून पक्षासाठी वाट्टेल ते करण्याची तयारी रविंद्र चव्हाण यांनी त्यांच्या अध्यक्षीय भाषणात बोलून दाखवलेली. त्यांच्या रूपाने भाजपाला रस्त्यावर उतरून आंदोलन केलेला आणि मातीशी जोडलेला कार्यकर्ता अध्यक्ष म्हणून मिळाला. निवडणूक काळातील वक्तव्याने, पेहरावाने झालेल्या वैयक्तिक स्वरूपाच्या टीकेमुळे रविंद्र चव्हाण बिलकुल विचलित झाले नाहीत. उलट त्यांनी विरोधकांना जनतेसाठी अनावश्यक अशा विषयात



गुंतवून ठेवून, भाजपासाठी विजयाची वाट अधिक सुकर केल्याचे स्पष्ट झाले. विरोधकांनी चव्हाण यांच्यावर केलेल्या वैयक्तिक टीकेला जनतेच्या दृष्टीने कवडीमोल किंमत असल्याचेही या निमित्ताने दिसले. २५ वर्षांच्या राजकीय वाटचालीत रविंद्र चव्हाण त्यांच्यावर झालेल्या प्रत्येक टीकेनंतर एक पाऊल पुढे जातानाच दिसले. याचे कारणच कायम संघर्ष करून यश संपादन केलेला रविंद्र चव्हाण यांच्यासारखा नेता महाराष्ट्रातील जनतेने अजून नीटसा पाहिलेला वा ओळखलेला नाही आणि राजकीय निरीक्षकांनी अजून अभ्यासलेला नाही. रविंद्र चव्हाण हे अत्यंत मुरलेले आणि मुरब्बी राजकारणी म्हणून महाराष्ट्रात आजच्या भाजपाच्या विजयाने उदयास आलेले आहेत हे दिसले.देवेंद्र फडणवीस यांना रविंद्र चव्हाण यांची बलस्थानं माहिती आहेत. पक्षासाठी २४ तास समर्पित अध्यक्ष म्हणून त्यांचे महत्त्व फडणवीस जाणून आहेत. रविंद्र चव्हाण यांचा शहरी महाराष्ट्राच्या राजकारणाचा अनुभव आणि त्यांची कायम निवडणूक सिद्धता म्हणजेच इलेक्शन रेडीनेस अशा स्वरूपाची कार्यशैली देवेंद्र फडणवीस ओळखून आहेत. त्यातच अडीच वर्षे सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून काम करताना अवघा महाराष्ट्र पिंजून काढत रविंद्र चव्हाण यांनी खात्याच्या माध्यमातून विकासकामे करताना संपूर्ण महाराष्ट्रात हेरलेली आणि पेरलेली माणसं ही भाजपासाठी महत्त्वाची ठरली असं दिसत आहे. आजच्या भाजपाच्या दैदिप्यमान विजयाचे शिल्पकार म्हणून देवेंद्र फडणवीस यांचे अष्टपैलू नेतृत्व जितके प्रखरतेने माध्यमांसमोर दिसलं तसेच प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांचा नियोजनाचा आवाका महाराष्ट्राच्या लक्षात येईल जेव्हा संपूर्ण विजयाची आकडेवारी प्रकाशित होईल.

# शिवाजी नाकाडे पब्लिक स्कूलमध्ये मातृप्रबोधन महिला मेळावा उत्साहात संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**सिरसी । प्रतिनिधी**

पेठवडज ता कंधार येथील श्री संत सेवालाल महाराज सेवाभावी शिक्षण संस्था संचलित शिवाजी नाकाडे पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये 'मकर संक्रांती'च्या निमित्ताने हळदी-कुंकू समारंभ आणि 'मातृप्रबोधनार्थ महिला मेळावा' अत्यंत उत्साहात पार पडला. या कार्यक्रमांतर्गत 'आदर्श माता पालक' यांचा गौरव करून महिलांच्या सन्मानाचा जागर करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन या विशेष मेळाव्याचे उद्घाटन मुखेडच्या लोकनियुक्त नगराध्यक्षा सौ. विजयाताई धोंडुराम देवडवार यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्त्या सौ. उषाताई संभाजीराव नाईक होत्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस मित्र संघटना नांदेडच्या जिल्हाध्यक्षा सौ. उज्वलाबाई गुरुसुडकर उपस्थित होत्या. पाहुण्यांचे मार्गदर्शन: आई हीच मुलांची पहिली गुरु या प्रसंगी बोलताना उद्घाटक सौ. विजयाताई देवडवार म्हणाल्या की, मुलं हे देशाचं भविष्य आहेत आणि त्यांना घडवण्याचं मुख्य कार्य माता करत असतात. आजच्या काळात महिलांनी केवळ घरापुरते मर्यादित न राहता बाह्य जगाचे ज्ञान घेणेही गरजेचे आहे. प्रमुख पाहुणे सौ. उज्वलाबाई गुरुसुडकर यांनी महिला सुरक्षेवर आणि कर्तव्यावर प्रकाश टाकला. त्या म्हणाल्या, जिजाऊ आणि सावित्रीचा वारसा आपण चालवत आहोत. आपल्या लेकींना केवळ शिकवू नका, तर त्यांना स्वावलंबी आणि निर्भीड बनवण्यासाठी प्रयत्न करा. मातांनी सजग राहिल्यास समाज नक्कीच प्रगत होईल. अध्यक्षीय समारोप करताना सौ. उषाताई नाईक यांनी नमूद केले की, शाळेने अशा प्रकारचे प्रबोधनपर कार्यक्रम राबवून पालकांशी संवाद साधणे ही कौतुकास्पद बाब आहे. कार्यक्रमाची वैशिष्ट्ये शाळेतील विद्यार्थ्यांच्या मातांचा 'आदर्श माता पालक' म्हणून विशेष सन्मान करण्यात आला. संक्रांतीच्या निमित्ताने पारंपरिक पद्धतीने हळदी-कुंकू आणि वाण वाटप करण्यात आले. 'आम्ही साऱ्या जणी, घालू आकाशाला गवसणी' या भावनेतून महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. नियोजन आणि आभार या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन संस्थेच्या सचिव सौ. जनाबाई शिवाजीराव नाकाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वृंदाने केले. शनिवारी सकाळी १० ते २ या वेळेत झालेल्या या सोहळ्याला परिसरातील शेकडो महिलांची उपस्थिती होती.



## हुतात्म्यांच्या पागोटे गावाला महेंद्रशेठ घरत रुग्णवाहिका देणार

# महेंद्रशेठ घरत यांची पागोटेच्या हुतात्म्यांना आगळीवेगळी आदरांजली

दैनिक वादळ वार्ता
**उरण । प्रतिनिधी**

उरण तालुक्यातील पागोटे येथे ४२ वा हुतात्मा स्मृतिदिन शनिवारी (ता. १७) साजरा करण्यात आला. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी हुतात्म्यांना आदरांजली वाहिली.प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी १९८४ मध्ये केलेल्या शौर्यशाली, गौरवशाली आणि ऐतिहासिक लढ्यात उरण तालुक्यातील पागोटे गावातील महादेव हिरा पाटील, केशव महादेव पाटील, कमलाकर कृष्णा तांडेल हे नवघर फाटा येथे पोलिसांच्या बेछूट गोळीबारात हुतात्मा झाले. त्यांच्या बलिदानाप्रीत्यर्थ पागोटे येथे हुतात्मा दिन साजरा केला जातो. दिबांचे अतुलनीय योगदान आणि हुतात्म्यांच्या बलिदानामुळेच प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्क्यांचे भूखंड मिळालेत. त्या आंदोलनात मी विद्यार्थिदशेत असतानाही सक्रिय होतो. त्यामुळे हुतात्म्यांना आदरांजली वाहणे हे माझे प्रथम कर्तव्य आहे. दिबांच्या लढ्याच्या मार्गावर माझी वाटचाल सुरू आहे. त्यामुळे अटल सेतूसाठी संपादित जमिनीला योग्य भाव मिळावा, म्हणून लढलो आणि शेतकरी वर्गाला न्याय दिला. अनेक गावांना मैदाने मिळवून देण्यासाठी सिडकोच्या अधिकारी वर्गाला धारेवर धरतोय. त्यामुळे हुतात्म्यांचे रक्त मी वाया जाऊ देत नाही, अशाप्रकारेच काम करतोय, असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी पागोटे येथे म्हणाले.




मॅनग्रोज प्रश्न भूमिपुत्रांच्या विकासाच्या आड येता कामा नये, सरकारने सकारात्मक विचार करावा, रोजगाराची संधी आहे. तरुणांनी कालानुरूप शिक्षण घ्यावे, असे आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.

यावेळी कॉ. भूषण पाटील म्हणाले,हुतात्म्यांचे स्वप्न साकार झाले नाही. जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना अद्यापही साडेबारा टक्के भूखंड मिळाले नाही. घरांचा प्रश्न गंभीर आहे.

यावेळी माजी आमदार मनोहर भोईर, उरणच्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष भावना घाणेकर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, दिबांचे पुत्र अतुल पाटील, कॉ. भूषण पाटील, रवी पाटील, संतोष पवार, पागोटे ग्रामपंचायतचे सरपंच कुणाल पाटील आणि सदस्य उपस्थित होते.पागोटे ग्रामविकास मंडळ, ग्रामपंचायत व ग्रामविकास सामाजिक ट्रस्ट यांच्या वतीने शालेय विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम आणि कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी रजनीकांत पाटील यांनी प्रास्ताविक केले. अपघाताचा प्रश्न गंभीर आहे. त्यासाठी रुग्णवाहिका हवी, अशी मागणी केली. तेव्हा क्षणाचाही विलंब न लावता रुग्णवाहिका देण्याचे महेंद्रशेठ घरत यांनी जाहीर केले.

## जि.प.शाळा धनंज येथे बाल आनंद मेळावा



दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**

नायगाव तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनंज या ठिकाणी बाल आनंद मेळावा आयोजित करण्यात आला होता या मेळाव्यात गावातील प्रमुख पदाधिकारी,पालक वर्ग,जिल्हा परिषद शाळेचे सर्व शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमध्ये बाल आनंद मेळावा संपन्न झाला आहे.

पहिली ते पाचवी या विद्यार्थ्यांना शालेय संस्कार देत यासोबत आपण कमाई कशी केली जातो याची जाणीव करून देण्यासाठी व त्यांना भविष्यामध्ये स्वालंबी बनवण्यासाठी या बाल आनंद मेळाव्याचे वैशिष्ट्य होते म्हणून बालमनावर चांगले परिणाम निर्माण झाले पाहिजे यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनज येथील विद्यार्थी विद्यार्थिनी अगदी पहिली ते पाचवी पर्यंतच्या सर्व सहभागी झाले होते आर्थिक व्यवहार समजावा म्हणून खरी कमाई हा उपक्रमात मुलांनी वेगवेगळ्या अनेक खाण्याचे पदार्थ आई-वडिलांच्या मदतीने बनविले होते.०१ ते १८ स्टॉल लावण्यात आले होते. ३७ पैकी ३० विद्यार्थी भाग घेतले असून या स्पर्धांमध्ये ७५००/-- रुपये चा व्यवहार झाला कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेळगाव चे शिक्षक ब्रह्मकर व शेख राज ,आशा वर्कर व गावातील सरपंच,उपसरपंच शालेय व्यवस्थापन समिती सर्व सदस्य सोसायटी चेअरमन व सर्व मित्र मंडळ विशेषतः महिला मंडळांचा सहभाग चांगला होता, सर्व उपस्थित राहून मुलांचे मनोबल वाढवले आणि हा बाल आनंद मेळावा आनंदाने संपन्न झाला सर्व उपस्थितांचे आभार धनंज

जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या वतीने मानलें.

## लक्ष्मण खेत्रे यांच्या कुटुंबाला २ लाखांचा विमा धनादेश सुपूर्द

# आ.विजयसिंह पंडित यांच्या हस्ते मंजुरी पत्राचे वाटप;खेत्रे कुटुंबाला शासकीय आधार

दैनिक वादळ वार्ता
**गेवराई । प्रतिनिधी**

काही दिवसांपूर्वी सर्पदंशाने निधन झालेले सुलतानपूर येथील माजी सरपंच लक्ष्मण खेत्रे यांच्या कुटुंबाला शासनाच्या गोपीनाथराव मुंडे शेतकरी अपघात सुरक्षा विमा योजनेअंतर्गत २ लाख रुपयांचे मंजुरी पत्र आज प्रदान करण्यात आले. गेवराई तालुक्याचे लोकप्रिय आमदार विजयसिंह राजे पंडित यांच्या हस्ते तहसील कार्यालय येथे हा धनादेश सुपूर्द करण्यात आला. लक्ष्मण खेत्रे यांचे सर्पदंशाने आकस्मिक निधन झाल्यामुळे खेत्रे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला होता. या कठीण काळात कुटुंबाला आर्थिक हातभार लागावा, यासाठी आमदार विजयसिंह पंडित व सरपंच धनेश्वर खेत्रे यांनी तातडीने पाठपुरावा करून या योजनेचा लाभ मिळवून दिला. यावेळी तहसील कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात तहसीलदार



संदीप खोमणे, कृषी अधिकारी श्री. गिरी साहेब, रुईचे कार्यसम्राट सरपंच कलिदास भाऊ नवले, भेंड खुर्द /सुलतानपूरचे सरपंच धनेश्वर खेत्रे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर खेत्रे उपस्थित होते या प्रसंगी बोलताना आमदार विजयसिंह पंडित म्हणाले की, लक्ष्मण खेत्रे हे गावातील एक अभ्यासू नेतृत्व होते. त्यांच्या जाण्याने कुटुंबाची पस्थां झालेली हानी भरून काढता येणार नाही, परंतु शासकीय योजनेच्या शासकीय मदतीचा हा धनादेश मिळाल्याबद्दल खेत्रे कुटुंबाने आमदारांचे ३/४ आहेत. यावे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बेलकूंड येथे बाल आनंद बाजारातून १२ हजार दोनशे रुपयाची उलाढाल

दैनिक वादळ वार्ता
**औसा । प्रतिनिधी**

_औसा तालुक्यातील बेलकुंड येथील जिल्हा परिषद शाळेत शनिवारी (दि. १७) जानेवारी रोजी 'बाल आनंद बाजार' मेळाव्याचे मोठ्या उत्साहात आयोजन करण्यात आले. कौतुकास्पद उपक्रमाद्वारे बाल आनंद बाजारात चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शिक्षणासह आर्थिक व्यवहाराचे धडे गिरवले. या बाजारातून १२ हजार दोनशे रुपयांची उलाढाल झाली.'बाल आनंद बाजाराचे' उद्घाटन सरपंच विष्णू कोळी यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष राम माने, तसेच शालेय समिती सदस्य महेश कोळी, सचिन डेंगळे, गावातील ग्रामस्थ हनुमंत करसुळे, रामहरी मदने, गणेश साळुंखे, हुसेन पठाण, शरद पवार,व मुख्याध्यापक एस जी शेख तसेच शिक्षक जी.जी दीक्षित, जी.एन मिटकरी, एच.एस मस्के, पी.पी खरोसे, एस.आर फावडे, ए.एस लेंडोळे, जी.एस मुंडे तसेच शिक्षिका एस.टी कुलकर्णी, एल.एस स्वामी, एस.एम कासराळे हे सर्व शिक्षक वृंद उपस्थित होते.यावेळी विद्यार्थ्यांनी स्वयंस्फूर्तीने बनवलेल्या विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल शाळेच्या प्रांगणामध्ये मांडण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी शेतामधून ताजा भाजीपाला विक्रीसाठी आणला होता. याचबरोबर विविध प्रकारचे स्नॅक्स, इडली, पोहे, डोसा, पॉपकॉर्न, पोंगा, अप्पे, समोसा, पाव वडा, नूडल्स, पोहे, भेळ, रानमेवा असे विविध प्रकारचे खाद्यपदार्थांनी खरेदी करण्यासाठी आलेल्या ग्रामस्थांचे लक्ष वेधले होते.यावेळी ग्रामस्थांनी ही सर्व खाद्यपदार्थावर ताव मारला. बाल आनंद बाजाराच्या माध्यमातून लहानग्या चिमुकल्यांनी बाल वयात शिक्षण करत असताना आर्थिक ऊलाढल काय असते? बाजारपेठेत आर्थिक व्यवहार कसे केले जातात व्यवसायामध्ये नफा-तोटा काय असतो याबद्दल माहिती घेतली. यावेळी पालकांनी आपल्या पाल्याची व्यवहारिक परीक्षा घेऊन त्यांच्या कडून खाद्य पदार्थ खरेदी कडून कौतुकाची थाप गावकऱ्यांनी सुद्धाद बाल आनंद बाजार मध्ये सहभागी होऊन खाद्य पदार्थाची खरेदी केली.



# महादेव सावंत यांची राष्ट्रवादी काँग्रेस वडवणी तालुका उपाध्यक्षपदी निवड

## आमदार प्रकाश दादा सोळंके यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान

दैनिक वादळ वार्ता
**वडवणी । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. ना. अजितदादा पवार साहेब, प्रदेशाध्यक्ष मा.खा. सुनीलजी तटकरे साहेब यांच्या आदेशाने तसेच माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार व माजी मंत्री मा. प्रकाशदादा सोळंके, युवा नेते जयसिंग भैय्या सोळंके व जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांच्या मान्यतेने वडवणी तालुक्यातील पुसरा येथील रहिवासी श्री. महादेव गणपतराव सावंत यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार गट) च्या वडवणी तालुका उपाध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे.




महादेव सावंत हे सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातून पुढे आलेले नेतृत्व असून वंचित, गोरगरीब व निराधार जनतेच्या प्रश्नांसाठी सातत्याने लढणारे कार्यकर्ते म्हणून त्यांची ओळख आहे. अन्यायाविरोधात प्रसंगी शासनाविरोधात रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची भूमिका त्यांनी वेळोवेळी घेतली आहे. यापूर्वी त्यांनी भाजपमध्ये कार्यरत राहून पक्षवाढीसाठी तसेच जनसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी उल्लेखनीय कार्य केले असून, या कार्यामुळे ते जनतेतील विश्वासार्ह नेतृत्व म्हणून उदयास आले आहेत.

त्यांचे सामाजिक व राजकीय कार्य लक्षात घेऊन विकासाभिमुख नेतृत्व असलेले आमदार प्रकाशदादा सोळंके यांनी त्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात महत्त्वाची जबाबदारी देत वडवणी तालुका उपाध्यक्षपदी नियुक्तीपत्र प्रदान केले. यावेळी सावंत यांनी पक्षाची विचारधारा तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रामाणिकपणे कार्य करावे तसेच पक्षाची प्रतिष्ठा जपून जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी अग्रक्रमाने काम करावे, अशा अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या.

नियुक्तीपत्र प्रदान प्रसंगी जिल्हा परिषद माजी सभापती डॉ. दत्तात्रय दुधाणे, तालुकाध्यक्ष बजरंग साबळे, राजेभाऊ लंगे, अंकुश नाईकवाडे, वैभव मस्के, राहुल चिंचकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.महादेव सावंत यांची राष्ट्रवादी काँग्रेस वडवणी तालुका उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत असून त्यांच्या माध्यमातून तालुक्यात पक्षसंघटन अधिक बळकट होईल तसेच येणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूका मध्ये पक्षाला याचा नक्कीच फायदा होईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## दिपभारती विद्यालयात आनंदनगरी बालमेळाव्याचे आयोजन

# विद्यार्थ्यांनी ४५ स्टॉल लावून केली २५ ते ३० हजाराची उलाढाल



दैनिक वादळ वार्ता
**भोकरदन । प्रतिनिधी**

सम्राट अशोक शिक्षण संस्था भोकरदन द्वारा संचलित दिप भारती माध्य. उच्च माध्यमिक विद्यालय दानापूर येथे आनंदनगरी बालमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते . कार्यक्रमाचे उद्घाटन दानापूर गावच्या सरपंच सौ पुष्पा दळवी यांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रिबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून व फीत कापून करण्यात केले . तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री वाय.एस. गवळी यांनी भूषविले . आनंद नगरीमध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या खाद्यपदार्थांचे एकुण ४२ स्टॉल लावले होते या कार्यक्रमाला शाळेतील विद्यार्थ्यांच्या पालकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावून स्टॉल धारक विद्यार्थ्यांकडून खाद्यपदार्थांची खरेदी करून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. यावेळी पालकांची तसेच सर्वच क्षेत्रातील मान्यवरांची व विद्यार्थ्यांची लक्षणिय उपस्थिती होती . कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले .

# खाद्यसंस्कृतीचा वारसा सांगणारी 'दादरी' बोरद परिसरातून हद्दपार; १४ किमीच्या पट्ट्यात केवळ एकाच शेतात पीक!

**नंदूरबार । दिपक गोसावी**

खान्देशाच्या खाद्यसंस्कृतीचा अविभाज्य भाग आणि आरोग्यासाठी अत्यंत पोषक मानली जाणारी 'दादर' (रब्बी ज्वारी) आता बोरद परिसरातून हळूहळू हद्दपार होताना दिसत आहे. कधीकाळी बोरद परिसरातील काळ्या कसदार जमिनीत डुलणारे हे पीक आज शोधूनही सापडेनासे झाले आहे. याचे विदारक चित्र तळोद्या पासून ते बोरद पर्यंतच्या १६ किलोमीटरच्या परिसरात पाहायला मिळत असून, या संपूर्ण पट्ट्यात आज केवळ एकाच शेतकऱ्याच्या शेतात दादरीचे पीक डौलाने उभे असल्याचे दिसून येत आहे.

**नैसर्गिक आणि रसायणमुक्त शेतीचा उत्तम नमुना:–**
आजच्या रासायनिक युगात दादर हे एकमेव असे पीक आहे ज्याला कोणत्याही प्रकारच्या रासायनिक खतांची किंवा फवारणीची गरज भासत नाही. ऑक्टोबरच्या थंडीत पेरणी झाल्यानंतर, केवळ पावसाळ्यातील साठलेला जमिनीतील ओलावा आणि हिवाळ्यातील दवबिंदूंच्या जोरावर हे पीक येते. नैसर्गिक पद्धतीने वाढत असल्याने हे धान्य आरोग्यासाठी 'अमृत' मानले जाते.

उन्हाळ्यातील 'थंडावा' देणारे धान्य
दादर ज्वारीचा गुणधर्म थंड असल्याने उन्हाळ्यात याच्या भाकरीला मोठी मागणी असते. तसेच याचा गोड आणि कसदार कडबा दुभत्या जनावरांसाठी उत्तम चारा ठरतो. मात्र, इतकी वैशिष्ट्ये असूनही बोरद परिसरातून हे पीक कमी होत असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.

तळोद्या पासून बोरद पर्यंतच्या मुख्य रस्त्यावरून प्रवास करताना आजूबाजूला नजर टाकल्यास प्रामुख्याने नगदी पिकांचे प्रमाण वाढल्याचे दिसते. मात्र, बोरद नजीक पश्चिम दिशेला केवळ एका ३ ते साडेतीन एकर क्षेत्रावर आज दादरीचे पीक डुलताना दिसत आहे. बोरद येथील शेतकरी दयानंद चव्हाण यांनी हे क्षेत्र या पिकासाठी निवडले आहे कारण या ठिकाणी कुठल्याही प्रकाराच्या सिंचनाची उपलब्धता नसल्यामुळे त्यांनी दादर पिकाला या ठिकाणी महत्त्व दिले आहे. त्यांनी पावसाळ्यात या क्षेत्रात कुठलेही पीक न घेता आपले शेत गव्हाई ठेवले होते जेणेकरून दादरीचे पीक त्यांना घेता येईल आणि त्यांनी आपल्या इच्छेप्रमाणे या ठिकाणी दादरीचे पीक घेतले आहे



जे आपल्या अंतिम टप्प्यात आहे. संपूर्ण परिसरात हे एकमेव शेत असल्याने, एकेकाळी समृद्ध असलेल्या या पिकाची आता अधोगतीकडे वाटचाल सुरू आहे की काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

### शेतकरी का पाठ फिरवत आहेत?

**नगदी पिकांचा वाढता कल कारण कापूस आणि मका यांसारख्या पिकांच्या तुलनेत ज्वारीकडे शेतकऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे.त्याचबरोबर लहरी हवामानामुळे रब्बीच्या पेरण्यांवर होणारा परिणाम.मजुरांची समस्या कारण काढणी आणि मळणीसाठी लागणारा जास्त खर्च आणि श्रमाची उपलब्धता कमी होणे.**

**दादर हे केवळ पीक नसून तो आपला खान्देशी वारसा आहे. रसायणमुक्त आणि सकस अन्नासाठी हे पीक वाचवणे गरजेचे आहे. जर हे पीक असेच कमी होत गेले, तर येणाऱ्या पिढीला दादरीची भाकरी केवळ पुस्तकातच पाहायला मिळेल.**
**– दयानंद चव्हाण,शेतकरी, बोरद परिसर.**

# खडकमांजरी येथे भव्य शिव किर्तन सोहळ्याचे आयोजन

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । राजकुमार पिल्लोळे**

लोहा तालुक्यातील खडकमांजरी येथे गुरुवार, दिनांक २२ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ८ ते १० वाजेदरम्यान भव्य शिवकिर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. देवाधिदेव शंभु महादेव यांच्या यात्रेनिमित्ताने आयोजित अखंड हरिनाम सप्ताह तथा तुलसी श्रीराम कथा ज्ञानयज्ञ सोहळ्या च्या सहाव्या दिवशी ही विशेष किर्तनसेवा संपन्न होणार आहे.

या शिवकिर्तन सोहळ्यासाठी सुप्रसिद्ध किर्तनकार श्री. ष. ब्र. १०८ युवासंत वेदांताचार्य दिगंबर शिवाचार्य महाराज वसमतकर (बापू) थोरला मठ संस्थान यांचे कीर्तन होणार असून, त्यांच्या प्रभावी व रसपूर्ण कीर्तनाचा लाभ भाविकांना घेता येणार आहे.या धार्मिक कार्यक्रमानिमित्त पंचक्रोशीतील सर्व भाविक, शिवभक्त व ग्रामस्थांनी मोठ्या



संख्येने उपस्थित राहून शिवकिर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन समस्त खडकमांजरी गावकरी मंडळींच्या वतीने*करण्यात आले आहे.

# आज टाकळी येथे विविध विकास कामांचा शुभारंभ सोहळा खा.बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील टाकळी ग्रामपंचायतीच्या वतीने गावातील विविध विकासकामांचा भव्य उद्घाटन सोहळा सोमवार, दि.१९ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ९ वाजता आयोजित करण्यात आला आहे.या उद्घाटन सोहळा बीड जिल्ह्याचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत संपन्न होणार आहे.ग्रामविकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या या कामांमुळे नागरिकांना मूलभूत सुविधा अधिक सक्षमपणे उपलब्ध होणार आहेत.या उद्घाटन सोहळ्यात टाकळी ते पाची अंबा वस्ती




रोड, गावांतर्गत स्मशानभूमी विकास, दलितवस्ती येथे अंगणवाडी खोली बांधकाम,पाणी फिल्टर बसविणे,कदमवाडी येथे अंगणवाडी खोली बांधकाम,गावासाठी २४ तास गावठाण लाईट फिडर,इजगर लवन तलाव येथे नवीन थ्री फेज रोहित्र (डी.पी.),लक्ष्मी आई मंदिर येथे सभा मंडप बांधकाम,मैनाजीची वस्ती कडे जाणारा सिमेंट रस्ता तसेच केज ते धनवाडा (भगवानबाबा वस्ती) रस्त्याची मजबुती व खडीकरण आदी विकासकामांचा समावेश आहे.या कार्यक्रमाचे आयोजन सरपंच तसेच ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कार्यालय टाकळी यांच्या वतीने करण्यात आले असून नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या विकासकामांमुळे टाकळी गावाच्या सर्वांगीण प्रगतीला गती मिळणार असल्याची भावना ग्रामस्थांत व्यक्त होत आहे.

# मारोती भोळे यांचे निधन

दैनिक वादळ वार्ता
**लोहा । प्रतिनिधी**

लोहा इंदिरानगर येथील तरुण मारोती



रोहिदास भोळे वय ४३ वर्ष यांचे अल्पशा आजाराने दि. १७ जानेवारी २०२६ रोजी रात्री ११.३० वाजता अल्पशा आजाराने विष्णूपुरी येथील शासकीय रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात आई,दोन बहिणी, एक भाऊ असा परिवार आहे. कालवश मारोती भोळे यांच्या पार्थिवावर दि. १८ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १ वाजता लोहा येथील स्मशानभूमीत शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# रमेश आडसकर पोहोचले थेट शेतवस्तीवर

## केंद्रीय राखीव दलात निवड झालेल्या उमेदवारांचा केला सत्कार!

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील साळेगाव येथील एका तरुणाची केंद्रिय राखीव पोलिस दलात निवड झाल्याची माहिती मिळताच रमेश आडसकर यांनी थेट शेतवस्तीवर जाऊन त्याचा सत्कार केला.

या बाबतची माहिती अशी की, साळेगाव येथील शेतकरी सुधार इंगळे यांचा मुलगा चि. अजय सुधाकर इंगळे याची केंद्रीय राखीव पोलीस दलामध्ये निवड झाली आहे. ही माहिती राष्ट्रवादी अजित पवार गटाचे बीड जिल्ह्याचे नेते तथा अंबा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन इतरमेश आडसकर यांना माहिती मिळाली. माहिती मिळताच रमेश आडसकर हे थेट साळेगाव येथील इंगळे वस्तीवर पोहोचले आणि त्यांनी अजय इंगळे याचा सत्कार केला. यावेळी साळेगावचे सरपंच कैलास पाटील, माजी सरपंच नारायण दादा लांडगे, चिंचोली माळीचे सरपंच सुनील बापू देशमुख, रवी गलांडे, माने, रामभाऊ गलांडे, संदीप राऊत, उपसरपंच गणेश गालफाडे, ग्रामविकास अधिकारी राजेभाऊ वरपे, ग्रामसेवक अंकुश इंगळे, ड. गणेश स्वामी, राजाभाऊ तिडके, अशोक टोपे, संजय इंगळे, विश्वनाथ पटणे, सौरभ राजेभाऊ वरपे, राजकुमार गित्ते, मधुकर अंधारे, बाबा अंधारे, तुषार लांडगे, नामदेव लांडगे, संतोष मेडकर यांच्यासह वस्तीवरील नागरिक इंगळे परिवार आणि मित्रपरिवार उपस्थित होते.

_प्रतिकूल परिस्थितीत यश संपादन केले :–
अजय इंगळे याचे कुटुंब साळेगाव पासून सुमारे दोन किमी अंतरावर असलेल्या इंगळे वस्तीवर राहात आहे. आई वडील शेतकरी आहेत. मात्र अजय याने जिद्द मनाशी मागून सराव केला आणि तो यशस्वी झाला.

# सातेफळचे रवींद्र घाडगे यांचे खा.सोनवणे यांनी केला सत्कार

दैनिक वादळ वार्ता
**गौतम बचुटे । केज**

केज तालुक्यातील सातेफळ ग्रामपंचायतीचे नवनिर्वाचित उपसरपंच रवींद्र घाडगे यांचा खा. बजरंग सोनवणे यांनी सत्कार केला.

या बाबतची माहिती अशी की, सातेफळ येथील उपसरपंच यांनी राजीनामा दिल्या नंतर झालेल्या उपसरपंचाच्या रिक्त पदावर रविंद्र घाडगे यांची निवड झाली आहे.त्या बद्दल नवनिर्वाचित उपसरपंच रवींद्र पांडुरंग घाडगे यांचा खासदार बजरंग सोनवणे यांनी सत्कार केला. तसेच पुढील कार्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी सरपंच कृष्णा



थोरात, माजी सरपंच बापूराव घाडगे, माजी उपसरपंच पांडुरंग भांगे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे दिव्यांग सेलचे जिल्हाध्यक्ष हनुमंत घाडगे, डिसले सर, अशोक बोबडे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# पर्यावरण रक्षणासाठी भूगोल दिन आवश्यक–डॉ.अर्चना वाघमारे

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

माऊली विद्यापीठ केज, संचलित सरस्वती महा विद्यालय,भूगोल विभागा कडून भूगोल दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी प्राचार्य डॉ.जी.बी. पाटील,प्रमुख पाहुणे डॉ. अर्चना वाघमारे यांची प्रमुख उपस्थिति होती सौरभ साळवे (पर्यावरण मित्र),डॉ.नागेश कराळे (भूगोल विभाग प्रमुख) यांची विचारमंचावर उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते पृथ्वीगोल ला पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.प्रमुख पाहुण्या प्रा. डॉ.अर्चना वाघमारे यांनी भूगोल दिनाची सुरुवात, भूगोलशास्त्रज्ञ सी.डी देशपांडे




यांचे भूगोल विषयातील योगदान आणि भूगोल दिनाच्या माध्यमातून सजीवांच्या अस्तित्वासाठी जनजागृती या विषयी सविस्तर असे मार्गदर्शन केले.पर्यावरण मित्र सौरभ साळवे यांनी, जागतिक तापमान वाढ पर्यावरणाचा ऱ्हास पर्यावरण प्रदूषण त्यातून निर्माण झालेली सजीव संबंध परिसंस्था मानवी आरोग्य याविषयी विविध संस्थांचे दाखले देत यासाठी आपली जबाबदारी आणि कर्तव्य याची जाणीव करून दिली .तसेच समृद्ध व स्वच्छ पर्यावरणासाठी स्वतःपासून सुरुवात करण्याचे आवाहन त्यांनी यावेळी केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ.नागेश कराळे यांनी केले तर आभार डॉ.मधुकर चाटे यांनी मानले.कार्यक्रमा साठी महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद ,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी, विद्यार्थिनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# लक्ष सायन्स क्लासेसच्या विद्यार्थ्यांना यशा कडे झेप घेण्यासाठी दिला निरोप समारंभ

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

लक्ष सायन्स क्लासेस आणि करिअर अकॅडमी च्यामाध्यमातून प्राध्यापक गालफाडे सर व त्यांच्या टीमने आजपर्यंत केज शहरातील व केज तालुक्यातील असंख्य विद्यार्थ्यांना डॉक्टर, इंजिनीयर,वकील,डी फार्मसी,नर्सिंग,कृषी आणि विविध क्षेत्रांमध्ये या क्लासेसचे विद्यार्थी सेवा देत आहेत.या क्लासेसला २४ वर्षे पूर्ण होत आहेत २००२ साली सुरू झालेले लक्ष सायन्स क्लासेस व करिअर अकॅडमी नावाचे एक रोपटे आज वटवृक्षाचे स्वरूप धारण करत आहे. म्हणजेच लक्ष सायन्स क्लासेस व करिअर अकॅडमी २००२ साली छोट्याशा स्वरूपात केज शहरात सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी प्रायव्हेट कोचिंग देण्याचं काम करत होती,आज या अकॅडमीने असंख्य विद्यार्थ्यांना उच्चपदावर आणि



नामांकित पदावर बसवण्याचं काम केलेल आहे.प्राध्यापक गालफाडे सरांच्या माध्यमातून ते काम यशस्वीपणे आज २४ वर्षांपासून चालत आहे.यावर्षी देखील सन २०२५–२६ बारावी सायन्स बॅचचे विद्यार्थी ज्ञानाची शिदोरी घेऊन यशाची झेप घेण्यासाठी निघाले आहेत आणि याच निमित्ताने प्रतीवर्षी प्रमाणे या विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून सर्व विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला आणि पुढील आयुष्यात विविध पदावर आपण यश संपादन करावे असे मत प्राध्यापक गालफाडे सर यांनी व्यक्त केले.यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.गोपिचंद सपाटे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.नितेश गुंड सर, प्रा.सौ.प्रियंका शिंदे होते.या कार्यक्रमाचे आभार जान्हवी कापरे या विद्यार्थिनीने सर्व प्रमुख पाहुण्यांचे आभार व्यक्त केले.

# जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचोली माळी येथे मकर संक्रांती निमित्त माता पालक मेळावा संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

दिनांक १७ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा चिंचोली माळी येथे मकर संक्रांती निमित्त माता मेळावा आयोजित केला होता.यात हळदी कुंकू व तिळगुळ कार्यक्रम घेण्यात आला याप्रसंगी गावच्या सरपंच सौ. देशमुख ताई या कार्यक्रमा च्या अध्यक्षस्थानी विराजमान होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय मुख्याध्यापक श्री. गलांडे सर यांच्या पत्नी सौ.गलांडे ताई,काटे ताई , पठाण ताई या उपस्थित होत्या.याप्रसंगी शाळेतील मुलांच्या माता बहुसंख्येने उपस्थित होत्या.या प्रसंगी जिजामाता व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व दिप प्रज्वलन करून कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली यावेळी शाळेचे मुख्याध्यापक श्री संजय गलांडे सर शाळे तील ज्येष्ठ शिक्षिका सौ. पिसे मॅडम,विशेष शिक्षिका बाराते मॅडम, श्रीमती मंजुषा वानखेडे मॅडम,मनीषा सोनवणे मॅडम,श्री.अमोल राऊत सर,बाळू नायकोडे सर, श्री.श्रीराम घुले सर,उर्दू शाळेतील मुजमील शेख सर,उर्दू शिक्षिका सम्रीन शेख मॅडम,अंगणवाडी ताई आदी उपस्थित होते. अध्यक्षीय समारोप करताना सरपंच सौ. देशमुख ताई यांनी यावेळी बोलताना सांगितले की, आपल्या शाळेतील भौतिक सुविधा तसेच इतर अडचणी प्राधान्याने सोडविणार आहे.काही अजुन समस्या असतील तर कळवाव्यात असे आवाहन करून मकर संक्रांतीच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या आहेत. आभार प्रदर्शनाने कार्यक्रम संपन्न झाला.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077